# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

रौप्य महोत्सवी वर्ष
१९७९-२००४

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
cacmjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ ७७७८ दिनांक: १७ ऑक्टोबर, २००५

**परिपत्रक क्र. १०५**

**विषय:** स्वीकृत निविदेंतर्गत ठोक बाबीतील बदलासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत.
**संदर्भ :** मध्यवर्ती कार्यालयाचे दिनांक १४.१.२००५ चे परिपत्रक क्र. १००.

स्वीकृत निविदेंतर्गत वाढीव परिमाणांच्या संदर्भात मार्गदर्शनपर सूचना या कार्यालयाच्या संदर्भिय परिपत्रक क्र. १०० नुसार निर्गमित केलेल्या आहेत. या परिपत्रकातील मुद्दा क्र. ८ नुसार स्वीकृत निविदेंतर्गत Lump sum तरतूद असलेल्या बाबींची वाढीव परिमाणे खंड-३८ अंतर्गत विचारात घेऊ नयेत अशा सूचना दिल्या आहेत. या परिपत्रकाच्या अनुषंगाने अधिकच्या मार्गदर्शनपर सूचना खालील प्रमाणे प्रसृत करण्यात येत आहेत.

१) जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता वाढली अथवा कमी झाली तर खंड-३८ अंतर्गत प्रस्ताव न करता,क्षमता वाढल्याने संकल्पन व तत्सम बाबी बदलत असल्याने मूळ बाब वगळून सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने अतिरिक्त बाब दरसूची नुसार अदायगी करावी.

२) जलकुंभाचे बांधकामाच्या पायाचे काम,कॉलम फूटींग ऐवजी राफ्टने करावे लागले तर, झालेल्या बदलानुसार ही वाढ, अतिरिक्त बाब दरसूचीने कॉंक्रिट व रेनफोर्समेंटच्या परिमाणाबरोबरच **खोदाई, रिफीलींग** ईत्यादी मध्ये होणारी वाढही अदा करावी **त्याचप्रमाणे** जर क्षेत्रिय बदलानुसार राफ्ट फूटींग ऐवजी कॉलम फूटींगने काम करायचे झाल्यास याच परिमाणामध्ये होणारी कपात विचारात घेऊन त्यावेळच्या दरसूचीने अदायगी मध्ये कपात करावी. मात्र अशा प्रस्तावांस सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घ्यावी.

**तेव्हा सद्य:स्थितीत प्रगतीपथावर असलेल्या कामांच्या निविदांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करावी तसेच यापुढे कामाच्या निविदा काढताना वरील सर्व बाबीचा उल्लेख निविदेंच्या SCHEDULE-B मध्ये तळ टिप (Foot Note) म्हणून करण्यात यावा.**

(दीपक भसाळे)
सदस्य सचिव

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१) सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा.
२) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
३) सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा .मंडळ.
४) सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., बांधकाम / प्रकल्प विभाग.

Oct-05/30